# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी सहाय निधी सुधारित नियमवाली सन २०१५.२०१६

१. ज्या विद्यार्थ्यांना केंद्र / महाराष्ट्र शासनाच्या, विद्यापीठाच्या कोणत्याही शिष्यवृत्ती, फ्रिशिपचा व शैक्षणिक शुल्काचा लाभ मिळत नाही अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

२. या योजनेसाठी प्रत्येक अधिविभागातून अभ्यासक्रमनिहाय जास्तीत जास्त दोन विद्यार्थी/विद्यार्थीनीची निवड करणेत यावी. यासाठी यापूर्वीचा विहीत नमुन्यातील अर्ज विद्यार्थी/विद्यार्थीनीने भरून तो आपल्या अधिविभागामध्ये सादर करावा.

३. सदर विद्यार्थी निवडण्यासाठी अधिविभागास समितीने त्या विद्यार्थ्याची शैक्षणिक गुणवत्ता, त्याची आर्थिक परिस्थिती, व या अनुषंगाने आवश्यक माहिती इ. निकषांच्या आधारे निर्णय घेवून त्याप्रमाणे संबंधित समितीने आपल्या अधिविभागातून जास्तीत जास्त दोन विद्यार्थ्याची/विद्यार्थीनीच्या नावाची या योजनेकरीता शिफारस करावी.

४. ही योजना ही एम.फिल. व पीएच.डी. अभ्यासक्रमास लागू नाही.

५. विद्यार्थी सहाय निधीसाठी शिफारस केलेल्या प्रत्येक विद्यार्थी/ विद्यार्थीनीस जास्तीत जास्त रू. १०००/— देणेत येईल.

६. सन २०१५.२०१६ या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थी सहाय निधीचे शुल्क म्हणून रू.२५/— याप्रमाणे शुल्क रक्कम जमा करून घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. अशा संकलित झालेल्या निधीमध्ये विद्यापीठ निधीमधून साधारणत: तेवढीच रक्कम विद्यार्थी सहाय निधीकडे वर्ग करून या योजनेसाठी कार्यालयाने उपलब्ध करून देण्यात यावी.

७. विद्यार्थी सहाय निधीबाबत यापूर्वी करण्यात आलेल्या नियमांच्याऐवजी सन २०१४.२०१५ पासून सदरचे नियम लागू राहतील.